अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
३१.०७.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १८१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712


# तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता शिक्षण संस्थांकडे

## अमरावतीत विद्यापीठ अन इंजिनिअरींग कॉलेजचे कँटीन सील

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – राज्यात एफडीए विभागाच्या कारवाईचा धडाका सुरू असून मुंबई उच्च न्यायालयाने एफडीए विभागाला सुनावल्यानंतर आता सरकारी आस्थापनांवर कारवाईला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, आजच मुंबईतील मंत्रालयाच्या कँटीनची तुकाराम मुंढेंच्या अधिकाऱ्यांनी तपासणी केली. त्यानंतर, विधिमंडळातील कँटीनची देखील तपासणी करण्यात आली आहे. दुसरीकडे आता आयुक्त तुकाराम मुंढेंच्या आदेशानुसार एफडीने आपला मोर्चा विद्यापीठांकडे वळवल्याचं दिसून येत आहे. अमरावतीमधील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात आज एफीडने धाड टाकत कारवाई केली आहे.

विद्यापीठ आणि येतील अभियांत्रिकी विद्यालायच्या मुख्य कॅन्टीनमध्ये एफडीने तपासणीसाठी धाड टाकली असता, उपहार गृहात प्रचंड अस्वच्छता आणि अधिकृत परवानाशिवाय हे उपहा गृह सुरू असल्याचे निर्दशनास आले. त्यानंतर, येथील कँटीन सील करण्यात आले आहे. अन्न औषध प्रशासनाचे सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांनी ही कारवाई केली. अमरावती विद्यापीठाची कँटीन आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची कँटीन पूर्णपणे बेकादेयशीर आणि विनापरवाना असल्याने तातडीची कारवाई करत दोन्ही उपहार गृहांना विभागाकडून टाळे ठोकण्यात आले आहेत.

दरम्यान, या कँटीनमधील अस्वच्छता आणि विनापरवानाच्या अनुषंगाने कारवाईबाबत अन्न व औषध प्रशासनाचे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला एफडीएकडून पत्र पाठवण्यात आलं आहे.

न्यायालयाच्या सुनावणीनंतर सरकारी आस्थापनांची तपासणी दरम्यान, नवी मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेलवर एफडीएकडून कारवाई करत ते हॉटेल सील करण्यात आले होते. त्यानंतर, हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात पोहोचले.

# पत्त्यांसारखी कोसळली भिवंडीत चार मजली इमारत

## ९ जणांचा मृत्यू : रात्री १२ वाजता हादरवणारं घडलं, कुटुंबीयांचा आक्रोश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – भिवंडी शहरातील बालाजी नगर गंगारामवाडी परिसरातील कोहिनूर अपार्टमेंट ही चार मजली इमारत कोसळली. या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर इमारतीच्या ढिगाऱ्याखाली दोन ते तीन जण अडकल्याची शक्यता आहे. पिलरच्या दुरुस्तीचे काम सुरू असतानाचा इमारत कोसळली. भिवंडी अग्निशमन दल, आपातकालीन व्यवस्था तसेच पोलिसांकडून बचावकार्य सुरु आहे. या इमारतीचं नाव कोहिनूर असून १२ ते १४ वर्ष जुनी असल्याची माहिती आहे.

या इमारतीला महापालिकेने धोकादायकची नोटीस बजावली होती. काल (३० जुलै) रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. दरम्यान घटनेची माहिती मिळतात पालिका आपत्कालीन कक्ष अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी धावून आले. परंतु इमारतीपर्यंत पोहोचण्यासाठी अरुंद रस्ता असल्या कारणाने बचाव सुरू करण्यात अडथळे येत होते. त्यानंतर रात्री एक वाजता घटनास्थळी एनडीआरएफचे पथक व टीडीआरएफ दाखल झाले. इमारतीच्या सुरुवातीला असलेली एक जुनी चाळ जेसीबीच्या सहाय्याने तोडून काढल्यानंतर दुर्घटग्रस्त इमारतीपर्यंत यंत्रणा पोहोचली. त्यानंतर बचाव कार्य करण्यासाठी सुरुवात केली आहे. कोहिनूर अपार्टमेंट ही २००७ मध्ये असिसमेंट असून २०१२ मध्ये ही इमारत बनवण्यात आली असून या इमारतीमध्ये दोन अपार्टमेंट होते. परंतु कमकुवत काम असल्याने सुरुवातीपासूनच इमारत धोकादायक झाल्याने पालिकेने ही इमारत धोकादायक घोषित केली होती. तर या इमारतीच्या एका विंगच्या तळमजल्यावर काही पिलर नादुरुस्त झाल्याने त्याची दुरुस्ती केली जात असल्याने काल सायंकाळी सहा वाजतापासूनच इमारतीला तडे जाण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे रात्री आठ वाजता इमारत झुकत असल्याने पालिका प्रभाग समिती क्रमांक चारचे सहाय्यक आयुक्त अरविंद घोगरे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल होत इमारत खाली करण्यात येत होती.

## थोडक्यात

### हायकोर्टाच्या दणक्यानं मंत्रालयातील कँटिनचं रूप पालटलं : अन्न सुरक्षेच्या नियमांची कडक अंमलबजावणी!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई उच्च न्यायालयाच्या कडक ताशेऱ्यांनंतर आणि अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईच्या धसक्याने मंत्रालयातील उपाहारगृहाचे रूप एका झटक्यात बदलल्याचे समोर आले आहे. कालपर्यंत अस्वच्छता आणि नियमांच्या उल्लंघनामुळे चर्चेत असलेल्या याच कँटिनमध्ये आता अचानक स्वच्छता आणि सुरक्षेचे काटेकोर नियम पाळले जात असल्याचे दिसून येत आहे. कर्मचाऱ्यांच्या हातात हँडग्लोव्हज, डोक्यावर कॅप्स आणि खाद्यपदार्थांवर करकरीत नवीन जाळ्या झाकलेल्या दिसत आहेत.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१४४६०० रु.(१०ग्रॅम)
२२.कॅ सोने -१३३००० रु.(१०ग्रॅम)
चांदी - २,३३,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | २७०० |
| तूर - | ७४५० - | ७९०० |
| मूग - | ६८०० - | ७२५० |
| उडीद - | ६५०० - | ७१०० |
| हरभरा - | ५८५० - | ६३०० |
| सोयाबिन - | ६८०० - | ७२०० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ११००० - | ११५०० |
| कापूस - | ९००० - | ९५५० |
| मका - | १७०० - | १८०० |

## सोलापूरजवळ भीषण अपघात!

# पुणे-उमरगा एसटीला ट्रकची जोरदार धडक : चालकासह महिलेचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सोलापूर** – सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील शेळगी परिसरात शुक्रवारी पहाटे भीषण अपघात झाला. पुण्याहून उमरग्याकडे जाणाऱ्या एसटी बसला ट्रकची जोरदार धडक बसल्याने एसटी चालकासह एका महिला प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला, तर सुमारे १० प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही एसटी बस पुण्यातील कुरकुंभ येथून धाराशिव जिल्ह्यातील उमरग्याकडे निघाली होती. पहाटे सुमारे ४.३० वाजता बस सोलापूर मध्यवर्ती एसटी स्थानकात पोहोचली. प्राथमिक माहितीनुसार, लोखंडी सळ्या घेऊन जाणाऱ्या ट्रकला एसटी बसची मागून धडक बसली. या भीषण धडकेत बसचा पुढील भाग चक्काचूर झाला. अपघातात एसटी चालक आणि एका महिला प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका केली. जखमी झालेल्या सुमारे १० प्रवाशांना तातडीने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली असून, अपघाताचे नेमके कारण काय होते, याचा पुढील तपास सुरू आहे.

# साधुग्राममधील प्रत्येक सुविधा भाविकांच्या सुरक्षिततेला पूरक ठरावी : डॉ.प्रवीण गेडाम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**पुणे** – सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे उभारण्यात येणाऱ्या साधुग्रामच्या नियोजनात भाविकांची सुरक्षितता, गर्दी व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था, नदी संवर्धन, जलनिस्सारण, आपत्कालीन सेवा, अखाड्यांच्या सुविधा आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन आराखडा तयार करावा, अशा सूचना नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांनी दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित साधुग्राम नियोजन आढावा बैठकीत ते बोलत होते. सर्व विभागांनी वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना नाशिक व त्र्यंबकेश्वर साधुग्रामसाठी भाविकसंख्या, पायाभूत सुविधा व तांत्रिक निकषांच्या आधारे नियोजनाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी डॉ.गेडाम यांनी घाटांची जास्तीत जास्त लांबी भाविकांसाठी उपलब्ध ठेवावी, गर्दी नियंत्रणासाठी रस्ते, घाट, पार्किंग व पादचारी मार्गांचे वैज्ञानिक नियोजन करावे तसेच सर्व विभागांनी समन्वयातून वेळेत कामे पूर्ण करावीत, अशा सूचना दिल्या.

# शंभराव्या मराठी साहित्य संमेलनासाठी ५ कोटी

### * साहित्य उपक्रमांसाठी एकूण १८ कोटींचा निधी, मंत्री उदय सामंत यांची घोषणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – पुण्यात होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी राज्य शासनाकडून ५ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, संमेलनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या ९९ नांदी साहित्य संमेलनांसाठीही ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या इमारतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी १ कोटी रुपयांचा धनादेश सामंत यांच्या हस्ते महाराष्ट्र साहित्य परिषदेला सुपूर्द करण्यात आला. शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर सामंत यांनी ही माहिती दिली.

यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह डॉ.स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, संमेलनाचे संयोजक राजेश पांडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.




# शाळांमधील उपाहारगृहांसमोर खाद्ययादीचा पेच : जंक फूड नियमांमुळे शाळांबाहेरील स्टॉलवर संक्रांत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) शाळा परिसरातील ५० मीटर हद्दीमध्ये जंक फूड जाहिरात वितरणावर बंदी घेतली आहे. यामुळे शाळांबाहेर वडापाव, समोसा पाव, ब्रेडरोल, मंच्युरियन रोल, चायनीज भेळ वगैरे खाद्यपदार्थ विक्री करणारे स्टॉलमालक आणि शाळांमधील उपाहारगृह चालक व शाळा प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. या जंक फूड नियमांमुळे शाळांबाहेरील स्टॉलवर संक्रांत येण्याची भीती स्टॉलधारक व्यक्त करत आहेत. मुंबईतील दादर-माटुंगा भागातील एका नामांकित शाळेबाहेरच्या पदपथावर विविध जंक फूडची विक्री होत होती. शाळेतील मुलेही वडापाववर ताव मारतात, तर



महाविद्यालयांच्या नाक्यांवर सँडविच, समोसे, वडे, मोमोज अशा पदार्थांची विक्री होते. त्यामुळे शाळा महाविद्यालयाच्या ५० मीटरबाहेर असलेल्या खाद्यपदार्थांच्या गाड्यांचे काय करणार, असा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना पडला आहे.

स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचा

# समाजाभिमुख उपक्रम : १२०० वृद्धांना काठीचा आधार!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनसेवा सप्ताहांतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या माध्यमातून वरुड येथे १२०० ज्येष्ठ नागरिकांना मोफत चालण्याच्या काठ्यांचे वाटप करण्यात आले. वृद्धांच्या दैनंदिन जीवनात आधार, सुरक्षितता आणि आत्मविश्वास वाढावा या सामाजिक उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



वाढते वय, शारीरिक अशक्तपणा आणि चालताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अनेक गरजू ज्येष्ठ नागरिकांना या उपक्रमाचा लाभ मिळाला. काठी हे केवळ चालण्याचे साधन नसून वृद्धांच्या स्वावलंबनाचे आणि सन्मानाने जगण्याचे प्रतीक आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या उपक्रमामुळे उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तसेच माजी आमदार देवेंद्र भुयार यांचे आभार मानले. समाजातील दुर्बल आणि गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हीच स्व.अजितदादा पवार यांना खरी आदरांजली असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, समाजसेवा जनकल्याण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी सातत्याने काम करणे हाच स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याचा वारसा आहे. त्याच विचारातून रक्तदान, वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी काठी वाटप यांसारखे विविध उपक्रम जनसेवा सप्ताहात राबविले जात आहेत. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक आणि मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वृद्धांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद हीच या उपक्रमाची खरी पावती ठरली.

यावेळी कार्यक्रमाला माजी आमदार देवेंद्र भुयार, बाळू कोहळे, तारेश देशमुख, अशपाक भाई, युवराज आंडे, शाम आजनकर, अमित देवते, निखिल बनसोड, विजय वडस्कर, विष्णु निकम, जगबीर सिंग भावे, सुभाष शेळके निलेश मगरदे, अभिजित चव्हाण, अन्सार बेग, सविता काळे, रसीका बरडे, मनीषा उईके, मंजु नरहरे, रोशनी तडस, दिपिका वाघमारे, अरुण खेरडे, ललीत थातोडे, विशाल सावरकर, राहुल बेलसरे, संदीप खडसे, भूषण चौधरी, सूरज धर्मे, सुमित गुर्जर, उत्तम पडोळे, नितिन गुर्जर, रोशन गायकवाड, जसमन सिंग भावे, नजीम काजी, बंटि काजी, जमीर पटेल, शब्बीर खान, साबीर खान. वैभव टेकाडे, नितीन आगरकर, रवींद्र डाफे, राजा ईमरान, सतीश पाटणकर समीर श्रीराव, रितेश देशमुख, रामचंद्र राऊत, मोसिन मिर्जा, थिरण पंडागळे, जुबेर खान, चेतन दवंडे यांच्यासह आदी मंडळी उपस्थित होती.

# गंभीर नियमभंग असेल तरच होते कारवाई, 'मी स्वतःला सिंघम मानत नाही'

एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची विशेष मुलाखत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - हॉटेल्स, दूध व्यावसायिक किंवा अन्य कोणावरही सरसकट कारवाई केली जात नाही, केवळ नियमभंग असेल तरच परवाना रद्द करण्यासारखे पाऊल उचलले जाते असे अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे. एफडीएच्या वांद्रे (पूर्व) येथील कार्यालयात गुरुवारी फ्री प्रेस जर्नलचे कार्यकारी संपादक एस. बालकृष्णन आणि वरिष्ठ प्रतिनिधी अमित श्रीवास्तव यांना दिलेल्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते. मी स्वतःला सिंघम मानत नाही. मी केवळ कायद्याने सोपविलेली जबाबदारी पार पाडणारा एफडीए आयुक्त आहे, असेही त्यांनी नमूद केले.



परवाने निलंबित करण्यापूर्वी संबंधितांना पुरेशी संधी दिली जात नसल्याच्या आरोपांबाबत ते म्हणाले की, हे आरोप निराधार आहेत. एखादे अन्न सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक असल्याचे आढळल्यास तत्काळ परवाना निलंबित करण्याचे अधिकार कायद्याने दिले आहेत. मात्र कमी गंभीर प्रकरणांमध्ये सुधारणा सूचना दिल्या जातात.

राज्यात तपासणी करण्यात आलेल्या ६०० हून अधिक हॉटेल आणि रेस्टॉरंटपैकी केवळ सुमारे ६० आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून सुमारे १५० जणांना सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. बहुतांश आस्थापने नियमांचे पालन करणारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यात १२ लाखांहून अधिक नोंदणीकृत किंवा परवानाधारक खाद्य व्यवसाय आहेत. त्यापैकी सार्वजनिक आरोग्याशी थेट संबंधित असल्याने हॉटेल, खानावळी, दूध व दुग्धजन्य पदार्थ करणारे यांच्यावरच्या कारवाईला प्राधान्य देण्यात आले आहे असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांच्या तक्रारींसाठी com-plaints.mahafda.in हे ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले असून आतापर्यंत सुमारे १,६०० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. नागरिकांचा सहभाग अन्नसुरक्षा सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

# दोन्ही शिवसेना अभिजीत दीपके यांच्या प्रेमात!

शिरसाट, बच्चू कडूंपाठोपाठ खैरे भेटीला : ठाकरेंचं दिपके परिवाला 'मातोश्री'वर येण्याचं आमंत्रण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था संचलित डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, गुरु-शिष्य परंपरा आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची जपणूक व्हावी या उद्देशाने गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणाचा दीप तळागाळापर्यंत पोहोचविणाऱ्या आणि स्त्री शिक्षणाचा हक्क मिळवून देणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. हा विधी शाळेच्या मुख्याध्यापिका नीता चिमोटे तसेच आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी मुख्याध्यापिका नीता चिमोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'गुरु हे केवळ ज्ञान देणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणारे, योग्य दिशा दाखविणारे आणि शिस्तीचे संस्कार रुजविणारे प्रेरणास्थान असतात.' कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत नेहा कुबडे यांनी गुरुचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व विशद केले तसेच कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले.

# जागतिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मोदींच्या अध्यक्षतेखाली 'सीसीएस'ची बैठक : पुरवठा साखळीवरील संकटावर मंथन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - जागतिक पातळीवर वाढता तणाव आणि विविध युद्धक्षेत्रांमुळे विस्कळीत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीची (सीसीएस) एक महत्त्वाची व तातडीची बैठक



पार पडली. सुमारे दोन तास चाललेल्या या बैठकीत तांबडा समुद्र, होर्मुझची सामुद्रधुनी, अदेनचे आखात आणि काळा समुद्र या संवेदनशील सागरी मार्गांमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या सुरक्षेवर व अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

संसद भवन संकुलात झालेल्या या बैठकीला 'सीसीएस'चे कायमस्वरूपी सदस्य संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन उपस्थित होते. याशिवाय रसायने व खते मंत्री जे. पी. नड्डा, वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, जहाजबांधणी मंत्री सर्वानंद सोनोवाल आणि पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी हे विशेष निमंत्रित म्हणून बैठकीत सहभागी झाले.

# शहांनी राजीनामा द्यावा, खरगेंचा हल्लाबोल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - 'विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज, पॅलेट गनच्या वापराचे आदेश कोणी दिले, या प्रश्नांची उत्तरे देशाला हवी आहेत.



गृहमंत्री अमित शहा हे त्याचे उत्तर देऊ शकत नसतील तर त्यांनी राजीनामा द्यावा', अशी जोरदार मागणी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी गुरुवारी राज्यसभेत केली.

केंद्र सरकारकडून राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत सार्वजनिक परीक्षा अयोग्य मार्गांचा प्रतिबंध सुधारणा विधेयक २०२६ मांडले. या विधेयकावर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर खरगे यांनी हल्लाबोल केला. पेपर चोरणारे वाचले, मेहनत करणारे मार खात राहिले, हा कसला न्याय. ही कसली पद्धत, असा सवाल मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. सरकारने जे विधेयक आणलेय त्यात आकडेवारी बदलली आहे, त्यातून काही होणार नाही. जादा दंड, कठोर शिक्षा, स्पेशल टास्क फोर्स, फास्ट ट्रॅक कोर्ट यासारख्या गोष्टींचा उल्लेख त्यात आहे, त्यामुळे काही फरक पडणार नाही, पेपरफुटी कशी रोखणार हे सरकारने सांगायला पाहिजे होते, असे खरगे म्हणाले. दिल्लीत इतकी गडबड होऊन देखील गृहमंत्री काही बोलत नाहीत, तोंड शिवलेय का कोणी, देशाच्या भल्यासाठी बोलावे लागते.

# आईच्या स्मृतीप्रित्यर्थ 'एक झाड आईच्या नावावर' उपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - एक झाड आईच्या नावावर (एक पेड माँ के नाम ) ही एक अत्यंत सुंदर आणि पर्यावरणपूरक राष्ट्रीय मोहीमे अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या आईबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी आणि पृथ्वीला हिरवेगार बनवण्यासाठी लोणी येथील अतुल नामदेव फुटाणे व सचिन नामदेव फुटाणे या दोन भावांनी आई च्या दशक्रिया निमित्त बहुगुणी औषधी वृक्ष असलेल्या लक्ष्मीतरु या झाडाचे वृक्षारोपण लोणी येथील मोक्षधाम येथे करण्यात आले.

## लोणी येथे लक्ष्मीतरुच्या ५ औषधी वृक्षांचे रोपण



स्व.गोदाबाई नामदेवराव फुटाणे यांना १९ जुलै २०२६ देवाज्ञा झाली त्यांचा मृत्यू कॅन्सर मुळे झाला होता म्हणून लोणी येथील अतुल नामदेव फुटाणे आणि सचिन नामदेव फुटाणे या दोन भावांनी आई च्या दशक्रिया निमित्त कॅन्सर वर मात करणारे औषधी वृक्ष असलेले लक्ष्मीतरु या झाडाचे वृक्षारोपण लोणी येथील मोक्षधाम येथे करण्याचे ठरवले त्या नुसार गावाकऱ्यांच्या उपस्थिती मध्ये लक्ष्मीतरु या वृक्षाचे ५ झाडांचे रोपन करण्यात आले या आयुर्वेदिक वनस्पती व वृक्षा बद्दल नागरिकांना माहिती व्हावी त्यासाठी लोणी येथील मोक्षधाम येथे माहिती फलक लावला असून त्यानिमित्ताने त्या ठिकाणी बहुगुणी औषधी वृक्ष असलेल्या 'लक्ष्मीतरु' या झाडाचा फायदे बद्दल माहिती दिली आहे.

लक्ष्मीतरुची पाने (सिमारोबा ग्लॉका) पारंपरिकरित्या त्याचा काढा करून घेतात जे रक्तातील साखरेचे प्रमाण कमी करणे, रोगप्रतिकारशक्ती वाढवणे आणि या झाडा मध्ये कर्करोगविरोधी गुणधर्म असल्याने मानवाच्या शरीराला फायदे देतात.

यावेळी लोणी येथील मोक्षधाम सुधार समितीचे अध्यक्ष बापूराव मेंढे, चंद्रपाल चारे, सुनील मोतीखाये, वासुदेव पोहरकर, प्रदीप झाडे, चंदू झाडे, विनोद कुबडे या सर्वच मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी डॉ.अभय खेरडे, अजिंक्य खेरडे, रमेश केणे, मंगेश बोबडे, कुणाल बोबडे, सुरज कुबडे, रवि माळोदे व इत्यादी वृक्षारोपणावेळी उपस्थित होते.

# संपादकीय

**परिस्थिती कशीही असो, चेहऱ्यावरचं हास्य कधीही कमी होऊ देऊ नका.**

## आरक्षण व्यवस्था : सामाजिक न्यायाचा आधार की नव्या आव्हानांची गरज?

भारतातील आरक्षण व्यवस्था ही केवळ सरकारी नोकऱ्या किंवा शैक्षणिक प्रवेशापुरती मर्यादित नसून, ती देशाच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहे. हजारो वर्षांच्या जातीय विषमता, सामाजिक भेदभाव आणि शैक्षणिक व आर्थिक वंचिततेतून मागासवर्गीय समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेने आरक्षणाचे धोरण स्वीकारले. आज स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही आरक्षणाचा विषय तितकाच महत्त्वाचा आणि चर्चेचा आहे. बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीत आरक्षणाचे स्वरूप, उद्दिष्टे आणि परिणाम यांचे नव्याने मूल्यांकन करण्याची गरज निर्माण झाली आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाची संकल्पना मांडताना त्यामागे समान संधी आणि सामाजिक न्याय हा मूलभूत हेतू ठेवला होता. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समाज शतकानुशतके शिक्षण, रोजगार आणि सत्तेपासून दूर राहिला होता. त्यामुळे समान स्पर्धेची संधी निर्माण करण्यासाठी आरक्षण ही सकारात्मक कृती (Positive Discrimination) म्हणून स्वीकारण्यात आली.

राज्यघटनेतील कलम १५(४), १६(४), ३३०, ३३२ आणि इतर तरतुदींमधून या व्यवस्थेला घटनात्मक संरक्षण देण्यात आले. आज देशात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि काही राज्यांमध्ये विशेष मागास प्रवर्गांसाठी आरक्षणाची व्यवस्था अस्तित्वात आहे. यामुळे लाखो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली, हजारो अधिकारी, डॉक्टर, अभियंते, शिक्षक आणि प्रशासकीय अधिकारी समाजातील वंचित घटकांतून घडले. अनेक कुटुंबांचे आर्थिक आणि सामाजिक जीवनमान उंचावले. त्यामुळे आरक्षणाने सामाजिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, हे नाकारता येणार नाही. मात्र, आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्नही उपस्थित होत आहेत. काहींचे मत आहे की आरक्षणाचा लाभ एकाच समाजातील तुलनेने सक्षम घटकांपर्यंतच मर्यादित राहत आहे, तर खऱ्या अर्थाने गरीब आणि दुर्गम भागातील कुटुंबे अजूनही मागे आहेत. 'क्रीमी लेयर'ची संकल्पना ओबीसी प्रवर्गासाठी लागू असली, तरी तिच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सातत्याने चर्चा होत असते. तसेच अनुसूचित जाती आणि जमातींसाठीही लाभाचे अधिक न्याय्य वितरण व्हावे, अशी मागणी वेळोवेळी पुढे येते. आरक्षणाच्या वाढत्या मागण्याही आज देशासमोरील एक मोठे आव्हान ठरत आहेत. विविध समाजघटक आरक्षणासाठी आंदोलने करीत आहेत. मराठा, जाट, पटेल, गुर्जर अशा अनेक समाजांच्या आंदोलनांनी आरक्षणाचा प्रश्न केवळ सामाजिक न राहता राजकीय विषयही बनल्याचे दिसून आले आहे.


# मागासवर्गीयांच्या आरक्षणाची वस्तुस्थिती

दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावरील Cockroach Janta Party (CJP) चे आंदोलन नुकतेच संपले. या आंदोलनात सर्व जाती-धर्माचे युवक एकत्र आले होते, म्हणून ते प्रस्थापित व्यवस्थेला रुचले नाही.

या आंदोलनाला काटशह देण्यासाठी आता मनुवादी व्यवस्था पुढे सरसावली आहे. त्यांनी RAH - Reservation Hatao Andolan या नावाने बॅनर तयार केला आहे. या प्रोफाईलला सीजेपी पेक्षाही जास्त फॉलोवर्स मिळाले आहेत असा त्यांचा दावा आहे आणि गोदी मीडियाकडून या बातम्या मोठ्या प्रमाणावर व्हायरल केल्या जात आहेत.

त्यांचे तंत्र जुने आहे - बहुजन युवकांची एकजूट तोडण्यासाठी, त्यांची माथी भडकवण्यासाठी आणि जातीय द्वेष पसरवण्यासाठी आरक्षणासारखा संवेदनशील मुद्दा वापरणे.

सीजेपीच्या आंदोलनात एक मुद्दा होता - नीट पेपरफुटीचे लाभार्थी वैद्यकीय क्षेत्रात आले तर रुग्णांचे आरोग्य धोक्यात येईल. याच मुद्द्याला पकडून आता आरक्षण विरोधक म्हणू लागले आहेत की,




'आरक्षणातून येणाऱ्या डॉक्टरांमुळेही आरोग्य सेवा धोक्यात येईल.' या खोट्या तुलनेवर गोदी मीडिया टीव्हीवर चर्चासत्रे घडवून आरक्षणाविरोधी वातावरण तयार करत आहे.

एका टीव्ही चर्चेत एक व्यक्ती धडधडीत खोटे बोलली की, 'मुळात बाबासाहेबांनीच आरक्षणाला विरोध केला होता आणि आरक्षण फक्त १० वर्षांसाठी असेल अशी तरतूद संविधानात केली होती.' बहुजन वंचित आघाडीचे प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी हा मुद्दा तिथेच खोडून काढला.

**वस्तुस्थिती अशी आहे:**

१० वर्षांचे आरक्षण हे फक्त राजकीय आरक्षण आहे, म्हणजे लोकसभा आणि विधानसभेतील राखीव जागांसाठी. त्यासाठी संविधानात कलम ३३० आणि ३३२ आहे. तर शैक्षणिक आणि नोकरीतील आरक्षण हे कलम १५(४), १६(४) आणि ३३५ अंतर्गत आहे आणि ते कायमस्वरूपी आणि अबाधित आहे. त्याला कोणतीही १० वर्षांची मर्यादा नाही. आरक्षण आणि सवलती या दोन पूर्णपणे वेगळ्या बाबी आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पष्टपणे म्हणतात - आरक्षण हा रोजीरोटीचा प्रश्न नाही; तो प्रशासनातील सहभागाचा प्रश्न आहे. आरक्षणाचा हा खरा उद्देश आहे. म्हणून आरक्षणाकडे आर्थिक निकषावर किंवा गरिबी हटाव योजनेसारखे पाहणे हीच मुळात मोठी चूक आहे. आरक्षणाचा संदर्भ हा सामाजिक न्याय आणि प्रतिनिधित्व या चौकटीतच पाहायला हवा. ज्या समाजाला हजारो वर्षे सत्तेपासून, शिक्षणापासून आणि प्रशासनापासून दूर ठेवले, त्याला प्रशासनात वाटा देणे हा त्याचा उद्देश आहे. मागासवर्गीयांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाले पाहिजे, अशी तरतूद असतानाही प्रत्यक्षात त्या जागा भरल्याच जात नाहीत. एकच उदाहरण घेतले तर या विषयाचे गांभीर्य लक्षात येते. संसदेत जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, केंद्र सरकारच्या मंत्रालयांमध्ये 'सेंट्रल स्टाफिंग स्कीम' अंतर्गत कार्यरत असणाऱ्या एकूण ३२२ उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे (सचिव आणि सहसचिव दर्जा) वर्गीकरण असे होते: सर्वसाधारण वर्ग: पाहिजे होते १५८ जागा (५०%), प्रत्यक्षात भरल्या २५४ जागा (७९%) ओबीसी: पाहिजे होते ८९ जागा (२७%), प्रत्यक्षात भरल्या ३९ जागा (१२%) अनुसूचित जाती: पाहिजे होते ४८ जागा (१५%), प्रत्यक्षात भरल्या १६ जागा (५%) अनुसूचित जमाती: पाहिजे होते २४ जागा (७.५%), प्रत्यक्षात भरल्या १३ जागा (४%) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षण लागू आहे, जे प्रामुख्याने उच्चवर्णीयांसाठी आहे आणि ते तात्काळ भरले जाते. हीच परिस्थिती देशातील सर्व सरकारी नोकऱ्यांमध्ये आहे. त्यामुळेच आरक्षणाचा हजारो पदांचा बॅकलॉग साचला आहे. मग प्रश्न असा पडतो की, जिथे असलेला अनुशेष (Backlog) सुद्धा भरला जात नाही, तिथे 'आरक्षण बंद करा' अशी कोल्हेकुई करण्यात काय अर्थ आहे? आरक्षण फक्त भारतातच आहे का? अजिबात नाही. जगभरात आरक्षण आहे, त्याला Affirmative Action म्हटले जाते.

अमेरिका, चीन, जपान यांसारख्या प्रगत देशांमध्येही ही तरतूद आहे आणि ती प्रामाणिकपणे राबवली जाते. भारतातून अमेरिकेत जाऊन सुंदर पिचाई, इंदिरा नूयी यांसारखे लोक मोठ्या कंपन्यांचे सीईओ बनू शकले, यामागे अमेरिकेतील कृष्णवर्णीय आणि अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व देणाऱ्या Affirmative Action च्या धोरणाचाही मोठा वाटा आहे, जे विविधतेला संधी देते. आरक्षण ही भीक नाही, ती हजारो वर्षांच्या सामाजिक बहिष्काराविरुद्धची भरपाई आणि देशाच्या प्रशासनात सर्वांचा सहभाग सुनिश्चित करण्याची घटनात्मक हमी आहे. त्यामुळे आरक्षण संपवण्याची भाषा करणे म्हणजे सामाजिक न्यायाची हत्या करण्यासारखे आहे.

**आर.के.जुमळे**

# पुनर्विकासाचे मृगजळ, 'बँक गॅरंटी'चा तिढा

मुंबई आणि उपनगरांचा गगनाला भिडणारा विस्तार पाहता, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या जागी टोलेजंग टॉवर्स उभे राहणे, हा आता या महानगराचा स्थायीभाव बनला आहे.

'पुनर्विकास' हे हजारो रहिवाशांच्या आयुष्यातील एका नव्या आणि सुखद पर्वाची नांदी असते. प्रशस्त घराचे स्वप्न, अत्याधुनिक सुखसोयी आणि घसघशीत 'कॉर्पस फंड'च्या आमिषाला भुलून अनेक गृहनिर्माण संस्था विकासकांच्या गोड आणि




भ्रामक आश्वासनांना बळी पडतात. परंतु, जेव्हा प्रकल्प अर्धवट अवस्थेत रखडतो, विकासक हात वर करतो आणि हक्काच्या निवाऱ्यालाही पारखे होण्याची विदारक वेळ येते, तेव्हा वास्तवाचे दाहक चटके बसतात. अशा संभाव्य आर्थिक प्रतारणेपासून सोसायटीला वाचवणारे एकमेव कायदेशीर आणि अभेद्य सुरक्षाकवच म्हणजे 'बँक गॅरंटी'. महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाच्या कलम ७९अच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विकासकाकडून बँक गॅरंटी घेणे हे कायदेशीर दायित्व आहे. मात्र, याच बँक गॅरंटीच्या अटी-शर्तींमध्ये पळवाटा शोधून सोसायटीची दिशाभूल करण्याचा कुटिल डाव अनेक विकासकांकडून आखला जातो. बँक गॅरंटी द्यायला टाळाटाळ करणाऱ्या तथाकथित बिल्डरांचे खरे आर्थिक पितळ आणि त्यांची कार्यपद्धती समजून घेणे, ही आजच्या काळाची सर्वात ज्वलंत गरज आहे. आजकाल रिअल इस्टेट बाजारात अशा अनेक विकासकांचा सुळसुळाट झाला आहे, ज्यांच्याकडे स्वतःचे भक्कम आर्थिक अधिष्ठान नसते. त्यांचा संपूर्ण डोलारा 'बार्टर सिस्टीम' (वस्तूविनिमय पद्धत) आणि तात्पुरत्या तडजोडींवर उभा असतो.असे केवळ 'वाटपाचे गणित' मांडून आणि उसनवारी करून जे लोक रातोरात 'बिल्डर' बनतात, त्यांच्यात बँक गॅरंटी देण्याची ना हिंमत असते, ना बाजारातील पत! अशा हवेतील कुबड्यांवर चालणाऱ्या विकासकांच्या नादी जेव्हा सोसायटीची कमिटी लागते, तेव्हा तिथेच सोसायटीचा 'अखखा घात' निश्चित होतो.

# ट्रम्प यांच्या संपत्तीची झपाट्याने वाढ : एका वर्षातील कमाई आणि वादांचा जागतिक पडसाद

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे जितके राजकारणासाठी प्रसिद्ध आहेत, तितकेच ते त्यांच्या व्यावसायिक साम्राज्य, वादग्रस्त निर्णय आणि आर्थिक व्यवहारांमुळेही सतत चर्चेत असतात. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आर्थिक अहवालांनुसार, ट्रम्प यांच्या संपत्तीत एका वर्षात तब्बल २.२ अब्ज डॉलरची वाढ झाल्याचे समोर आले आहे. अवघ्या ३६५ दिवसांत झालेली ही प्रचंड आर्थिक वाढ जगभरात चर्चेचा विषय ठरली आहे. या आकड्यामुळे ट्रम्प यांच्या व्यवसायातील विस्तार, गुंतवणूक, डिजिटल मालमत्ता आणि इतर आर्थिक उपक्रमांकडे पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

ट्रम्प यांची ओळख केवळ राजकारणी म्हणून नाही, तर अमेरिकेतील मोठ्या रिअल इस्टेट उद्योजकांपैकी एक म्हणूनही आहे. न्यूयॉर्कसह अनेक शहरांतील



आलिशान इमारती, हॉटेल्स, गोल्फ रिसॉर्ट्स, व्यावसायिक संकुले आणि विविध ब्रँडिंग करार यांच्या माध्यमातून त्यांनी अनेक दशकांत मोठी आर्थिक ताकद निर्माण केली आहे. राष्ट्राध्यक्षपदाच्या काळात आणि त्यानंतरही त्यांच्या व्यावसायिक हितसंबंधांवर सातत्याने चर्चा होत राहिली आहे.

गेल्या वर्षभरात ट्रम्प यांच्या संपत्तीत झालेल्या वाढीमागे अनेक कारणे असल्याचे विश्लेषक सांगतात. त्यांच्या सोशल मीडिया कंपनीच्या बाजारमूल्यातील चढ-उतार, डिजिटल मालमत्तांमधील गुंतवणूक, परवाना करार, ब्रँड वापर शुल्क आणि विविध व्यावसायिक व्यवहारांमधून त्यांना मोठा आर्थिक फायदा झाल्याचे मानले जाते. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल अर्थव्यवस्था आणि ब्रँड मूल्य यांचा प्रभावी वापर करून त्यांनी आपली आर्थिक स्थिती अधिक मजबूत केली.

मात्र, ट्रम्प यांच्या आर्थिक यशाबरोबरच अनेक वादही कायम चर्चेत राहिले आहेत. त्यांच्या कंपन्यांशी संबंधित आर्थिक व्यवहार, करप्रकरणे, मालमत्तेच्या मूल्यांकनावरील प्रश्न आणि विविध न्यायालयीन खटल्यांमुळे ते अनेकदा चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. काही प्रकरणांमध्ये न्यायालयांनी त्यांच्यावर आर्थिक दंडही ठोठावला, तर काही प्रकरणांमध्ये त्यांनी आरोप फेटाळून लावत न्यायालयीन लढा सुरू ठेवला. त्यामुळे त्यांच्या व्यवसायातील यशाइतकेच त्यांच्याभोवतीचे वादही जगभरात चर्चिले जातात.

ट्रम्प यांच्या राजकीय कारकिर्दीतही अनेक धाडसी आणि वादग्रस्त निर्णय पाहायला मिळाले. राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांनी 'अमेरिका फर्स्ट' या धोरणावर भर दिला. आयात शुल्क वाढविणे, चीनविरोधी व्यापार धोरण, स्थलांतरावरील निर्बंध, मेक्सिको सीमाभिंतीचा मुद्दा आणि आंतरराष्ट्रीय करारांबाबत घेतलेल्या भूमिकेमुळे त्यांनी जागतिक राजकारणात वेगळी छाप निर्माण केली. त्यांच्या समर्थकांच्या मते हे निर्णय अमेरिकेच्या आर्थिक हितासाठी आवश्यक होते, तर विरोधकांच्या मते या धोरणांमुळे जागतिक संबंधांमध्ये तणाव वाढला. सोशल मीडियाचा वापर हे ट्रम्प यांचे आणखी एक वैशिष्ट्य राहिले आहे. पारंपरिक माध्यमांना वळसा घालत त्यांनी थेट जनतेशी संवाद साधण्याचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या प्रत्येक विधानाचा जागतिक बाजारपेठ, शेअर बाजार आणि राजकीय चर्चांवर परिणाम होत असल्याचे अनेकदा दिसून आले. त्यामुळे त्यांची प्रतिमा ही केवळ राजकारण्याची नसून प्रभावी ब्रँड म्हणूनही निर्माण झाली आहे.

अर्थकारणाच्या दृष्टीने पाहिले, तर ट्रम्प यांच्या संपत्तीत झालेली वाढ ही जागतिक गुंतवणूकदारांसाठीही अभ्यासाचा विषय ठरत आहे. एका व्यक्तीच्या नावाभोवती उभ्या राहिलेल्या व्यावसायिक ब्रँडचे मूल्य, गुंतवणुकीतील विविधता आणि बाजारातील संधींचा वापर यामुळे मोठी आर्थिक वाढ कशी साध्य होऊ शकते, याचे उदाहरण म्हणूनही या प्रकरणाकडे पाहिले जाते. त्याचवेळी, सार्वजनिक पद भूषविणाऱ्या व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि हितसंबंधांचा संभाव्य संघर्ष याविषयीचे प्रश्नही अधिक ठळकपणे समोर येतात.

जागतिक स्तरावर ट्रम्प यांच्याबाबतची मते आजही दोन टोकांची आहेत. एक गट त्यांना यशस्वी उद्योजक आणि ठाम नेतृत्वाचे प्रतीक मानतो, तर दुसरा गट त्यांच्या निर्णयांवर, वक्तव्यांवर आणि व्यावसायिक पद्धतींवर टीका करतो. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक आर्थिक घडामोडीला राजकीय आणि सामाजिक संदर्भही जोडले जातात. ट्रम्प यांच्या एका वर्षातील अब्जावधी डॉलरच्या संपत्तीवाढीने पुन्हा एकदा हे स्पष्ट केले आहे की आधुनिक अर्थव्यवस्थेत ब्रँड मूल्य, डिजिटल गुंतवणूक, भांडवली बाजार आणि सार्वजनिक प्रतिमा यांचा मोठा प्रभाव असतो. मात्र, या यशासोबत उत्तरदायित्व, कायदेशीर चौकट आणि सार्वजनिक विश्वास यांनाही तितकेच महत्त्व आहे. कोणत्याही मोठ्या आर्थिक यशाचे मूल्यमापन करताना केवळ संपत्तीच्या आकड्याकडे न पाहता ती कशा मार्गाने निर्माण झाली, त्यातील पारदर्शकता किती आहे आणि त्याचे व्यापक परिणाम काय आहेत, याचाही विचार करणे आवश्यक आहे.

शेवटी, ट्रम्प यांची वाढती संपत्ती आणि त्यांच्याशी संबंधित विविध घडामोडी या केवळ एका व्यक्तीच्या आर्थिक यशाची कथा नाही. त्या जागतिक राजकारण, व्यवसाय, माध्यमे आणि सार्वजनिक जीवन यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्याचेही प्रतीक आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक आर्थिक टप्प्याकडे जगाचे लक्ष लागून असते. येत्या काळातही त्यांच्या व्यावसायिक आणि राजकीय निर्णयांचा जागतिक अर्थव्यवस्था व राजकारणावर काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# एनटीआर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची तायक्वांदो स्पर्धेत दुहेरी कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था वरुड द्वारा संचलित नामदेवराव तुकारामजी रडके हायस्कूल येथील विद्यार्थी तन्मय दिनेश सावरकर याने तायक्वांदो स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करुन शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

तन्मयने १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अकोला येथे आयोजित ३ ओपन इंटर कल्ब तायक्वांडो चाम्पियनशिप मध्ये २६ किलो वजन गटात रौप्यपदक पटकावून आपल्या उत्कृष्ट कौशल्याचा ठसा उमटविला. त्यानंतर २८ जून २०२६ रोजी अमरावती जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित '२ अचीव्हर्स तायक्वांडो कप २३ किलो वजन गटात कांस्यपदक मिळवत सलग दुसरे यश संपादन केले. तन्मयच्या या दुहेरी यशामुळे शाळेसह पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्याच्या मेहनतीला आणि चिकाटीला सर्व स्तरातून दाद मिळत आहे. भविष्यातही तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अशीच चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक योगेश बरडिया, नवयुवक शिक्षण संस्थाध्यक्ष संजय गणोरकर, सचिव पुरुषोत्तम कळमकर, पदाधिकारी जगदीश नेरकर, पर्यवेक्षक शशांक पाचघरे, शिक्षक प्रतिनिधी उज्वल वानखडे, तसेच संपूर्ण शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालकवर्ग यांनी तन्मय दिनेश सावरकर याचे मनःपूर्वक अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेने तन्मयच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत त्याच्या आगामी स्पर्धांसाठी यशस्वी कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# मध्यवर्ती कारागृहात कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अमरावती** – राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे अमरावती मध्यवर्ती कारागृहात कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर पार पडले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी कारागृहातील बंद्यांना प्ली बार्गेनिंग म्हणजे शिक्षा किंवा आरोप कमी करून घेण्यासाठी आरोपीने न्यायालयात अथवा फिर्यादीसोबत केलेला गुन्हा कबूल करण्याचा करार, वाटाघाटी करण्याच्या प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन केले. न्यायरक्षक कार्यालयाचे मुख्य अधिवक्ता ॲड. जितेंद्र देशमुख यांनी उपस्थितांना कायदेविषयक विविध हक्क आणि स्पृहा योजनेबद्दल मार्गदर्शन केले. कारागृह उपअधिक्षक प्रदिप इंगळे यांनी प्रास्ताविक केले. न्यायरक्षक कार्यालयातील सहायक अधिवक्ता ॲड.प्राजक्ता वरुडकर यांनी सूत्रसंचालन केले. सहायक अधिवक्ता ॲड.सृष्टी शिरभाते यांनी आभार मानले.

# अमरावती जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून आढावा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**बीड** – गेल्या काही दिवसांपासून अमरावती जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांतील नद्या-नाल्यांना पूर आला असून काही गावांचा मुख्य रस्त्यांशी संपर्क तुटला आहे. पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून प्रशासनाकडून तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी परिस्थितीची दखल घेतली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून जिल्ह्यातील पूरस्थितीची सविस्तर माहिती घेतली. तसेच, नागरिकांना तातडीने मदत पोहोचवण्यासाठी व कोणतीही जीवित किंवा वित्तहानी होऊ नये,यासाठी प्रशासनाला अत्यंत सतर्क राहून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

## पोलीस निरीक्षक अशोक जाधव व महिला अधिकारी मोनिका मंदाले यांच्या मार्गदर्शनात

# न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये 'ऑपरेशन कवच' जनजागृती अभियान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






**वरुड** – अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन कवच' या विशेष जनजागृती अभियानांतर्गत न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात वरुड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव व महिला पोलीस अधिकारी मोनिका मंदाले यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती, सायबर सुरक्षा, बाल संरक्षण आणि सुरक्षित भविष्यासंदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी 'नशेला नकार, जीवनाला स्वीकार' हा संदेश देत 'ऑपरेशन कवच' मोहिमेचा उद्देश स्पष्ट केला. यानंतर महिला पोलीस अधिकारी मोनिका मंदाले यांनी विद्यार्थ्यांना 'गुड टच' आणि 'बॅड टच', बालहक्क, स्वसंरक्षण आणि वैयक्तिक सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी वरुड पोलिसांच्या या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच नैतिक मूल्ये, कायदेशीर साक्षरता आणि स्वसंरक्षणाचे शिक्षण देणारे असे उपक्रम काळाची गरज असल्याचे सांगितले. या संवादामुळे विद्यार्थ्यांमध्ये पोलिसांबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

या मार्गदर्शन शिबिराला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# एनटीआर हायस्कूलमध्ये 'ऑपरेशन कवच' जनजागृती अभियान उत्साहात

## सायबर सुरक्षा व व्यसनमुक्तीचा विद्यार्थ्यांना दिला प्रभावी संदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन कवच' या जनजागृती अभियानांतर्गत नवयुवक शिक्षण संस्था संचालीत एन.टी.आर हायस्कूल येथे सायबर सुरक्षा व व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमातून इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना डिजिटल युगातील सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे तसेच व्यसनमुक्त, सुदृढ आणि जबाबदार जीवनशैली स्वीकारण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य योगेश बरडिया हे होते. प्रास्ताविक करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण व जबाबदारीने वापर करावा, सोशल मिडियाचा सकारात्मक उपयोग करावा तसेच कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहून आदर्श आणि सुजाण नागरिक बनण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हा बाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन सतीश डाखोळे तर आभार मिलिंद पाचपोहर यांनी मानले. यावेळी प्रगती फुटाणे, उज्वल वानखडे, ऋषिकेश चौधरी, प्रणाली आमझरे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थित मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

# माणसे कमी, कामाचा वाढता ताण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कामकाजाच्या वेळेत करण्यात आलेल्या बदलांमुळे आणि अपुऱ्या मनुष्यबळामुळे शारीरिक तसेच मानसिक त्रास होत असल्याची तक्रार महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) प्रयोगशाळेतील अनेक कर्मचाऱ्यांनी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, या तक्रारीबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

प्रयोगशाळांमध्ये सुरू करण्यात आलेली दोन शिफ्टची कार्यपद्धती रद्द करावी, शासन निर्णयानुसार पूर्वीचे कार्यालयीन वेळापत्रक लागू करावे आणि शनिवार-रविवारच्या साप्ताहिक सुट्ट्या पुन्हा सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

## डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूलमध्ये

# विविध उपक्रमांतून गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था संचलित डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, गुरु-शिष्य परंपरा आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची जपणूक व्हावी या उद्देशाने गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणाचा दीप तळागाळापर्यंत पोहोचविणाऱ्या आणि स्त्री शिक्षणाचा हक्क मिळवून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. हा विधी शाळेच्या मुख्याध्यापिका नीता चिमोटे तसेच आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी मुख्याध्यापिका नीता चिमोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'गुरु हे केवळ ज्ञान देणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणारे, योग्य दिशा दाखविणारे आणि शिस्तीचे संस्कार रुजविणारे प्रेरणास्थान असतात.'

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत नेहा कुबडे यांनी गुरुचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व विशद केले तसेच कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले. लतिका शेळके आणि रुद्र चौधरी यांनी गुरुंबद्दल मनोगत व्यक्त करत प्रेरणादायी विचार मांडले. आठवीच्या विद्यार्थिनींनी गुरुभक्तीपर सुंदर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. संस्कार, शिक्षण आणि भारतीय परंपरेचा सुंदर संगम घडविणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# अहिल्यानगरमध्ये डॉ.रंजन बेलसरे यांचे संधिवातावर व्याख्यान

## होमिओपॅथी उपचारांची परिणामकारकता वैज्ञानिक दृष्टिकोनातून उलगडली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथील सुप्रसिद्ध होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ.रंजन बेलसरे यांनी अहिल्यानगर येथे आयोजित वैद्यकीय शैक्षणिक परिषदेत 'संधिवात व सांध्यांच्या आजारांवरील होमिओपॅथी उपचारांची परिणामकारकता' या विषयावर अभ्यासपूर्ण व संशोधनाधिष्ठित व्याख्यान देत उपस्थित वैद्यकीय तज्ज्ञांची दाद मिळविली.

या कार्यक्रमास विविध शाखांतील डॉक्टर, होमिओपॅथी चिकित्सक तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या सादरीकरणात डॉ.बेलसरे यांनी गाऊट, ऱ्हुमेटॉइड आर्थ्रायटिस, गुडघेदुखी, सांधेदुखी तसेच इतर वातरोगांमध्ये होमिओपॅथी उपचारांची भूमिका वैज्ञानिक पुरावे, क्लिनिकल अनुभव आणि यशस्वी उपचारांच्या केस स्टडींच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडली.

उपचारांमुळे लाभ झालेल्या अनेक रुग्णांची उदाहरणे सादर करत त्यांनी होमिओपॅथी उपचारपद्धतीची परिणामकारकता स्पष्ट केली. त्यांच्या संशोधनाधिष्ठित आणि चिकित्सक मांडणीला उपस्थित डॉक्टरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कौतुकाची थाप दिली.

व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात डॉ.बेलसरे यांनी उपस्थित डॉक्टरांच्या विविध शंकांचे समाधानकारक निरसन केले. आधुनिक वैद्यकीय संशोधन, क्लिनिकल अनुभव आणि होमिओपॅथी उपचारपद्धती यांचा समन्वय साधत त्यांनी विषयाचे सखोल विवेचन केले. त्यांच्या ज्ञानपूर्ण मांडणीचे सर्व स्तरांतून विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी आयोजकांच्या वतीने डॉ. रंजन बेलसरे यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या समाजाभिमुख वैद्यकीय सेवेचे तसेच होमिओपॅथी उपचारपद्धतीच्या प्रभावी प्रसारासाठी केलेल्या कार्याचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आधी हाडं मोडलात, आता एफआयआर करुन खाती बंद करत आहात, मोदी-शाह तुम्ही 'जनरेशन झेड'ला धमकावून गप्प करु शकत नाही : राहुल गांधींचा हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – नवी दिल्लीतील जंतर मंतरवर झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलना दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात कथितरित्या अपमानास्पद भाषा वापरल्याप्रकरणी एका २५ वर्षीय तरुणीवर दाखल झालेल्या पोलीस गुन्ह्यावरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला आहे. मोदी सरकार 'जनरेशन झेड'चा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत, गांधी यांनी पोस्ट केले की, पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांशी कसे वागतात याबद्दल 'सावधगिरी' बाळगली पाहिजे.

तुम्ही 'जनरेशन झेड'ला धमकावून गप्प करू शकत नाही 'पंतप्रधान मोदी आणि अमित शाह – तुम्ही 'जनरेशन झेड'ला धमकावून गप्प करू शकत नाही. आधी तुम्ही त्यांची हाडे मोडली. आता तुम्ही एफआयआर दाखल करत आहात आणि त्यांची खाती नोंदवून घेत आहात. तुम्ही भारताचा भूतकाळ आहात.

भारताच्या भविष्याशी कसे वागता याबद्दल सावधगिरी बाळगा,' अशा शब्दात राहुल गांधी यांनी 'एक्स'वर पोस्ट करत मोदी शाहांवर सडकून प्रहार केला आहे. २३ जुलै रोजी जंतर मंतर येथे केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल रुचिका सिंहवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिक्षकांना एसआयआर कामातून कार्यमुक्त करा

## शिक्षक संघटना पुन्हा आक्रमक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – निवडणूक आयोगाच्या एसआयआर मोहिमेची अंतिम मुदत ८ ऑगस्ट रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे बीएलओ कामासाठी नियुक्त शिक्षकांना ८ ऑगस्टनंतर या कामातून मुक्त करण्यासाठी शिक्षक संघटना पुन्हा आक्रमक झाल्या आहेत. शिक्षकांना अध्यापन कामासाठी शाळेत उपस्थित राहण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी शिक्षक महासंघाकडून करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे शिक्षकांचे मुख्य कार्य आहे. यानंतरही बीएलओ किंवा एसआयआरची कामे शिक्षकांना देण्यात आली आहेत. निवडणूक कामे शिक्षकांना देण्यास संघटनांनी विरोध केला होता. यानंतरही शिक्षकांना निवडणूक कामे देण्यात आली आहेत. मात्र एसआयआर मोहीमेची अंतिम मुदत ८ ऑगस्ट रोजी संपुष्टात येत आहे. राज्यातील अनेक शाळांमधील शिक्षक सध्या बीएलओ म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे शाळांतील अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम पूर्णतेवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि शाळांमधील नियमित अध्यापन सुरळीत ठेवण्यासाठी ८ ऑगस्टनंतर शिक्षकांना बीएलओच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची मागणी केली आहे. शिक्षकांना कार्यमुक्त करण्यासंदर्भातील आदेश तातडीने जारी करण्यात यावे, अशी मागणी शिक्षक महासंघाने केली आहे. यासंदर्भात शिक्षक महासंघाने शालेय शिक्षण विभागाला निवेदन दिले आहे. शिक्षकांना 'एसआयआर'च्या कामाला जुंपल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याची टीका होत आहे.

# फुलेवाडा विस्तारीकरणाचे काम कासव गतीने

## मंत्री छगन भुजबळ यांनी नाराजी : २०० कोटींचा निधी मंजूर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – पुण्यातील महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या ऐतिहासिक निवासस्थानाच्या म्हणजेच फुलेवाडा विस्तारीकरण प्रकल्पाच्या संथ गतीने सुरू असलेल्या कामाबाबत राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी गुरुवारी तीव्र नाराजी व्यक्त केली.

भुजबळ म्हणाले की, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी राज्य शासनाने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असूनही प्रत्यक्ष कामाची गती समाधानकारक नाही. मुख्यमंत्री या प्रकल्पाचा सातत्याने आढावा घेत असून, आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासन पूर्णपणे तयार आहे. आता प्रशासनाने मरगळ झटकून कामाला युद्धपातळीवर गती देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हा प्रकल्प केवळ इमारतीच्या विस्तारीकरणापुरता मर्यादित नसून महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा आणि सामाजिक कार्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

मात्र, प्रशासकीय विलंबामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला अडथळे निर्माण होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. फुलेवाड्या

# देवेंद्र फडणवीस यांच्याइतके निर्णय मराठा समाजासाठी कोणीच घेतले नाहीत!- राधाकृष्ण विखे पाटील

## आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जरांगेंना पाठवणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मराठा समाजाच्या मागण्यांबाबत महायुती सरकार अत्यंत सकारात्मक असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात घेतलेली भूमिका आतापर्यंतच्या एकाही मुख्यमंत्र्याने घेतली नाही, असे प्रतिपादन मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुक्रवारी केले.

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर, सरकारने आतापर्यंत मराठा समाजासाठी घेतलेल्या निर्णयांचा व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल त्यांना पाठवला जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. मागण्या पूर्ण न झाल्यास २९ ऑगस्टपासून पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर विखे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारची भूमिका स्पष्ट केली. राज्य सरकारने वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीमुळे जरांगे यांच्यावर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, असा विश्वास व्यक्त करत ते म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात काही निर्णय रद्द झाल्याने समाजाचे मोठे नुकसान झाले होते. मात्र, फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने बंद पडलेल्या सर्व योजना पूर्ववत सुरू केल्या आहेत. शिंदे समितीला २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, समितीने आतापर्यंत ५८ लाख कुणबी नोंदी शोधल्या आहेत आणि हे काम अजूनही सुरूच आहे. याशिवाय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पूर्ववत करणे, सारथी संस्थेतील जागा वाढवणे, आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना नोकऱ्या देणे आणि वैधता प्रमाणपत्राची मुदत वाढवून देणे असे अनेक ठोस निर्णय सरकारने घेतले आहेत. तसेच हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने आढावा घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# चंद्रकांत पाटलांना नोबेल पुरस्कार द्या, जागतिक विज्ञान विद्यापीठाचं कुलगुरू करा, नाहीतर देश एका मोठ्या वैज्ञानिकाला मुकेल...

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – देशाची राजधानी दिल्ली येथे काही दिवसांपूर्वी झालेल्या सीजेपीचं आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळाला, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिल्यानंतर आंदोलन शांत झालं, मात्र हे आंदोलन संपलं तरी देखील या आंदोलनाची जोरदार चर्चा सुरू आहे.

या प्रकरणी अनेक आरोप प्रत्यारोप होत झाल्याचे चित्र दिसून येत आहे, अशातच काल(गुरूवारी, ता३०) रोजी भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या एका वक्तव्यावरून आज राज्याच्या वतुर्ळात चांगलीच चर्चा सुरू आहे. आंदोलनामध्ये जे दगड वापरले गेलो होते, त्याच्यावरचे ठसे आधारकार्डशी लिंक केले जाणार असून त्याआधारे तपास केला जाणार असल्याच्या संदर्भातील एका वक्तव्यांचा त्यांनी उच्चार केला होता.

मात्र चंद्रकांत पाटलांच्या वक्तव्यावरती शिवसेना ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी हल्लाबोल करत त्यांना पुरस्कार द्यावी असंही मिश्किलपणे म्हटलं आहे.

चंद्रकांत पाटील यांना नोबेल पुरस्कार देण्याची शिफारस मुख्यमंत्री फडणवीस यांनी करावी, त्यांना एखाद्या जागतिक विज्ञान विद्यापीठाचं कुलगुरू करता येईल का ते पहावं, असं म्हणत राऊतांनी पाटलांना डिवचलं आहे.

आज माध्यमांशी बोलताना म्हटलं की, चंद्रकांत पाटील जे बोलले, त्याबद्दल मी ते वाचलं. चंद्रकांत दादा हे उच्चशिक्षण आणि तंत्रज्ञान मंत्री आहेत. त्याच्यामध्ये विज्ञान वगैरे हे विषय येतात.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.जे.एस.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५९६/२०२६** **ने.ता.१९/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती शहेनाज बी इनायत खा, वय अं.७६ वर्ष,धंदा–घरकाम

२) मिनाज खान इनायत खान, वय अं.३४ वर्ष, धंदा- मजुरी

अर्जदार क्र.१ व ३ रा.वरुड, ता.जि.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे इनायत खा इस्माईल खा, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१९/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५९७/२०२६** **ने.ता.२५/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) राज मोहम्मद नुर मोहम्मद मोहब्बे, वय अं.५८ वर्ष,धंदा–शेती

२) रहमतुल्ल नुर मोहम्मद मोहब्बे, वय अं.६५ वर्ष, धंदा- शेती

अर्जदार क्र.१ व २ रा.टेंभुरखेडा, ता.जि.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे नुर मोहम्मद शेख शामद व जयतुनबी नुर मोहम्मद मोहब्बे, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२५/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३३८/२०२६** **ने.ता.१०/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) मनोहर गुलाबराव देशमुख, वय अं.७६ वर्ष, धंदा–शेती, रा.शनिवार पेठ वरुड, २) ओमप्रकाश गुलाबराव देशमुख, वय अं.७४ वर्ष, धंदा–सेवानिवृत्ती, रा.अमरावती, ता.जि.अमरावती, ३) शोभा धुडीराज साबळे, वय अं.७० वर्ष, धंदा- घरकाम, ४) धनंजय गुलाबराव देशमुख, वय अं.६५ वर्ष, धंदा- शेती, क्र.३ व ४ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत नर्मदा गुलाबराव देशमुख, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१०/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६३६/२०२६** **ने.ता.०२/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुषमा दिपक टाकरखेडे, वय अं.५६ वर्ष, धंदा–गृहिणी, २) चैतन्य दिपक टाकरखेडे, वय अं.३० वर्ष, धंदा- शिक्षण, ३) अक्षत दिपक टाकरखेडे, वय अं.२५ वर्ष, धंदा- शिक्षण, ४) श्रीमती कलावती भाऊरावजी टाकरखेडे, वय अं.८५ वर्ष, धंदा- काही नाही, सर्व रा.लोणी, ता.नरखेड, जि.वरुड, ह.मु.प्लॉट नं.९, हरिओम कॉलनी, ओंकार नगर रोड, पावर्ती नगर स.ओ.नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दिपक भाऊरावजी टाकरखेडे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# विदर्भात पावसाचा हाहाकार! अमरावतीच्या नांदगाव खंडेश्वरमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस, यवतमाळच्या पुरात कारसह तीनजण वाहून गेलीत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार विदर्भात सर्वत्र पावसाचा हाहाकार बघायला मिळतो आहे.

अशातच यवतमाळ जिल्ह्यात पावसाची संततधार सुरु असून अनेक जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना पावसाने अक्षरशः झोडपून काढलं आहे. तर तिकडे दहेली येथील कुपटी नदीच्या पुलावर एक मोठी दुर्घटना घडली आहे.

यात पुरात ईर्टिगा कारसह तीनजण वाहून गेल्याची घटना घडली आहे. यात पती थोडक्यात बचावला आहे. मात्र पत्नी व दोन चिमुकल्या मुली अद्याप बेपत्ता असल्याची माहिती आहे. तर तिकडे अमरावतीच्या नांदगाव खंडेश्वरमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस कोसळलाय.




परिणामी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धामक गावाचा संपर्क तुटला असल्याची माहिती आहे. गावाला चारही बाजूने पाण्याने वेढल्याने गावाला बेटाचे स्वरूप आले आहे. यातील ५० ते ६० कुटुंबातील लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. ऐकूनच विदर्भातील उर्वरित जिल्ह्यातही पावसाचा जोर कायम असल्याचे चित्र आहे.

यवतमाळच्या कुपटी नदीच्या पुरात कारसह तीनजण वाहून गेल्याची घटना यवतमाळ जिल्ह्यातील दहेली येथील कुपटी नदीच्या पुलावर एक मोठी दुर्घटना घडली आहे. यात पुरात ईर्टिगा कारसह तीनजण वाहून गेल्याची घटना घडली आहे. यात पती थोडक्यात बचावला आहे. मात्र पत्नी व दोन चिमुकल्या मुली अद्याप बेपत्ता असल्याची माहिती आहे.

पुराच्या पाण्याचा अंदाज चुकल्याने ही घटना घडल्याची माहिती आहे. तर यात अविनाश खंडारे झाडावर चढून राहिल्याने ते थोडक्यात बचावले आहे. माधवी खंदारे व दोन मुलींचा रात्रीपासून शोध सुरू असून लोणीकडे परतताना या कुटुंबावर काळानं घाला घातला असून पूल ओलांडण्याचा प्रयत्न जीवघेणा ठरला आहे.

या घटनेनं दारव्हा तालुक्यातील दहेली परिसर हादरला आहे. सध्या प्रशासनाचे बचाव पथक शोधमोहीमेत व्यस्त असून प्राची आणि साची अशा वाहून गेलेल्या दोन्ही मुलीचे नाव आहे. घटनेची माहिती रात्री ३ वाजता मिळताच पालकमंत्री संजय राठोड यांनी प्रशासनाला तत्काळ मदतीचे आदेश दिलेत.

यवतमाळ जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट, सर्व शाळा-महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर यवतमाळ जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जाहीर करण्यात आला असून सर्व शाळा-महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी तसे आदेश काढले आहे.

**नांदगाव खंडेश्वर तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस**

दरम्यान, अमरावतीच्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस बरसला आहे. यात पावसाच्या विळख्यात सापडलेल्या १०० लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. अमरावतीच्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यात ढगफुटी सदृश्य पावसाने हाहाकार माजवला आहे. परिणामी नदी नाल्याला पूर आला असून नदीकाठी घर असलेल्या सुमारे १०० लोकांना सुरक्षित स्थळी रात्री हलवण्यात आले. नांदगाव खंडेश्वर मधील धामक, धानोरा गुरव, मंगरूळ चव्हाळा, खेड पिंपरी, परसमंडळ, दिघी कोल्हे या गावासह अनेक गावात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली. गावाला नदी नालाची स्वरूप आले. तर सातरगाव परिसरात मेंढी नाल्याच्या पुरात आल्याने यात एक दुचाकीस्वार वाहून गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. नांदगाव खंडेश्वर शहरात देखील पावसाने कहर माजवला गावात पाणीच पाणी दिसून आल तसेच शेती खरडून निघाल्या आहेत. नांदगाव खंडेश्वर तालुक्यात सर्व शाळा महाविद्यालय बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. १०० लोकांना नांदगाव खंडेश्वरच्या मंगल कार्यालयामध्ये रात्री उशिरा व्यवस्था करून त्यांना ठेवण्यात आलं.

## नाफेडकडून कांदा दरात पुन्हा वाढ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नाशिक*** – कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देत नाफेडमार्फत आणि एनसीसीएफ मार्फत करण्यात येणाऱ्या कांदा खरेदीच्या किमान हमी खरेदी दरात पुन्हा एकदा वाढ केली असून ही या हंगामातील सातवी वाढ आहे. ३० जुलै २०२६ पासून ग्रेड-ए दर्जाच्या कांद्यासाठी प्रतिक्विंटल २,३३५ रुपये इतका नवीन हमी दर लागू करण्यात आला आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# देशाच्या गृहमंत्र्याचे हात विद्यार्थ्यांच्या रक्ताने बरबटलेले

## त्यांच्या अंगावर विद्यार्थ्यांच्या रक्ताचे, अश्रूंचे शिंतोडे पडलेत : संजय राऊतांचा कडाडून प्रहार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जंतर मंतरवर हुकूमशाहीविरुद्ध लढणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांना ठेचून मारण्याचा प्रयत्न झाला, ते आदेश गृहमंत्री अमित शहांचे होते.

देशाच्या गृहमंत्र्याचे हात विद्यार्थ्यांच्या रक्ताने बरबटलेले आहेत. त्यांच्या अंगावर विद्यार्थ्यांच्या रक्ताचे, अश्रूंचे शिंतोडे पडलेले आहेत, असा सडकून प्रहार खासदार संजय राऊत यांनी केला. विद्यार्थ्यांना रस्त्यावर सोलून काढल्यापासून अमित शाह संसदेत येत नसल्याने विरोधकांनी चौफेर घेरलं आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही शाह यांच्यावर चौफेर हल्ला चढवला आहे.



राष्ट्रभक्तीचं ढोंग लावता, पण संजय राऊत म्हणाले की, अँटी पेपर लीक विधेयकावर राज्यसभेत चर्चा झाली, पण इतका मोठा गंभीर प्रश्न असताना विद्यार्थ्यांवर लाठीमार झाला, टिअर गॅस-नळकांडी फोडली, पॅलेट गन वापरल्या, मुलं जखमी झाली. हजारो विद्यार्थ्यांनी संसदेवर धडक दिली. एरवी विद्यार्थी आणि परीक्षांवर बोलणारे पंतप्रधान आणि गृहमंत्री संसदेमध्ये उपस्थित नव्हते. ज्या खात्याचा संबंध नाही असे मंत्री उत्तर देत होते.

तुम्ही वंदे मातरमवर विशेष अधिवेशन घेता, राष्ट्रभक्तीचं ढोंग लावता, पण जेव्हा हे विधेयक चर्चेला आलं तेव्हा पंतप्रधान आणि अमित शहा संसदेत नसतात.'

त्यांच्या बुद्धीची मला कीव येते संजय राऊत यांनी सांगितले की, लोकमान्य टिळकांसारख्या कर्त्या पुरुषाने स्वाभिमानाने, अभिमानाने आणि शौर्याने ईस्ट इंडिया कंपनीशी दोन हात केले. त्यांच्या नावाचा पुरस्कार सध्याच्या 'ईस्ट इंडिया कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक' अमित शहा यांच्या हस्ते देण्याचा घाट ज्यांनी घातलाय, त्यांच्या बुद्धीची मला कीव येते. पुणेकरांनी त्यांना विरोध करायचं ठरवलेलं आहे.

# जगाच्या पाठीवर 'मेन इन ब्लू' ओळख असताना टीम हॉकी इंडियाची जर्सी भगवी करताच वाद पेटला

## देशाच्या हॉकी नर्सरीतून सुद्धा कडाडून विरोध, २ माजी कॅप्टनचा तीव्र संताप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – २०२६ च्या हॉकी विश्वचषकापूर्वी भारतीय हॉकी संघाच्या जर्सीचा रंग निळ्यावरून भगवी करण्यात आला आहे. माजी कर्णधार विरेन रासकिन्हा यांनी या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले, 'निळी जर्सी ही आमची ओळख होती.' आणखी एक माजी कर्णधार, पतगत सिंग यांनीही जर्सीचा रंग बदलल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की म्हणाले की,




खेळाडूंच्या पसंतीनुसार जर्सीचा रंग बदलण्यात आला आहे. हॉकी इंडियाने २७ जुलै रोजी पुरुष आणि महिला संघांसाठी नवीन जर्सी सादर केल्या. 'संघांना भगव्या रंगाची जर्सी का देण्यात आली' भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार विरेन रासकिन्हा यांनी या निर्णयाला विरोध केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर लिहिले की, संघाला भगव्या रंगाची जर्सी घालायला लावणे लज्जास्पद आहे. दुसरीकडे, हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप कुमार तिर्की म्हणाले की, खेळाडू, कर्णधार, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ यांच्या सूचनांच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला.

